# कार्यालय नगर परिषद, नागभीड

क्रमांक/नपना/नियोजन/अकृषक/२०२१/ ९[illegible]६
दिनांक :- १०/८/२१

वाचा :- १. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २२/१२/२०१४ नुसार महाराष्ट्र जमिन अधिनियम ३७ महसुल संहिता १९६६ यात करण्यात आलेल्या सुधारणाचे अध्यादेश.

२. शासन निर्णय क्रमांक एन ए पी - 2016 /प्र क्र .7 /टी -1 दिनांक 22 जाने.2016

संदर्भ :-

१) श्री.विजय तुळशिराम येरणे व इतर १ रा.नागभीड ता.नागभीड जि-चंद्रपुर यांचा प्राप्त प्रस्ताव दिनांक २०/०५/२०१९
२) मा. उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) सामान्य चंद्रपूर यांचे पत्र क्र. ५४/२०१९ दिनांक ३१/०७/२०१९
३) मा. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) चंद्रपूर यांचे पत्र क्र. ३०४/२०१९ दिनांक ०४/०९/ २०१९
४) मा. आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर यांचे पत्र क्रं. ३४०/२०१९, दि १८/०६/२०१९
५) मा तहसीलदार ,नागभीड यांचे अभिप्राय पत्र क्र. ७१५/२०१९ दि १०/११/२०१९
६) मा. कार्यकारी अभियंता अउदा प्रकल्प विभाग म रा वि प कं म र्या चंद्रपूर यांचे नाहरकत पत्र क्र. १८८४, दिनांक २६/०८/२०१९
७) मा. सहाय्यक संचालक नगररचना कार्या चंद्रपूर यांचे अंतिम मंजुरी अभिन्यास आदेश क्र. ९२५, दिनांक ०७/०४/२०२१
८) मा.कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग नागपुर यांचे नाहरकत पत्र ६१०२/२०१९ दिनांक ८/११/२०१९
९) मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपणी लि.ब्रम्हपुरी यांचे पत्र क्रं.३०४० दिनांक २१/११/०१९

## आदेश

(दिनांक १०/०८/२०२१)

ज्या अर्थी **श्री. विजय तुळशिराम येरणे व स्वप्नील रमेश येरणे रा.नागभीड** जि- चंद्रपुर यांनी चंद्रपुर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मौजा- **नवखळा** या ठिकाणी **स. न. २२९/३ आपल्या मालकीच्या जमीनीतील आराजी ०.६६ हे.आर. पैकी ०.६६ हे.आर.** ऐवढया जागेचा **रहिवास** या बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत अर्ज केलेला आहे. त्याअर्थी आता महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम व त्याखालील नियम १९६९ च्या अंतर्गत तरतुदीस अधिन राहून महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४(१) अन्वये अर्ज सादर केल्यामुळे महाराष्ट्र जमिन महसुल जमिन (सुधारणा) अध्यादेश २०१४ अन्वये व त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १५२ अन्वये प्राप्त अधिकरास अनुसरून मी नियोजन प्राधिकरणअधिकारी तथा मुख्याधिकारी खालील अटि व शर्तीस अधिन राहून **श्री. विजय तुळशिराम येरणे व स्वप्नील रमेश येरणे रा.नागभीड** जि- चंद्रपुर यांची मौजा- **नवखळा** येथील **स. न. २२९/३ आराजी ०.६६ हे.आर. भोगवटदार वर्ग - १ म्हणजेच एकूण ६६००.०० चौ. मीटर** कृषक जमिन **संदर्भ क्र. २ ते ९** नुसार नाहरकत प्रमाणपत्रातील नोंद केलेल्या अटि व शर्ती अर्जदाराला मंजुर असल्याचे गृहीत धरून खालील विवरणानुसार **रहिवास प्रयोजनार्थ जमिनीचा विकास करण्यासाठी** मान्यता देत आहे.

## AREA STATEMENT

| | | |
|---|---|---|
| 1 | GROSS AREA OF LAND | 6600.00sq.mtr |
| 2 | Dedustion for | |
| | a)Road Acquisition Area | Nil |
| | b)proposed road | Nil |
| | C)Any reservation | Nil |
| 3 | Remaining Gross Area of Plot (1+2) | 6600.00 sq.mtr |
| 4 | DEDUCTION FOR | |
| | a)Recreational Open Space as per regulation | 676.99 sq.mtr |
| | b)Interal Road | 1508.37 |
| | c) Aminity space if any (5%)=18 | 356.99 |
| | Total Deductions (a+b+c) | 2542.35 |
| 5 | Area Under Plots=(3-4) | 4057.65 sq.mtr |
| 6 | Net area of plots for FSI Calculation =0.90*(1-(2+4c) =090*(6600-(0+356.99) | 5618.70 |
| 7 | Permissible FSI factor for layout plots =(6/5) 5618.70/4057.65 | 1.38 |

## Schedule Of Plots (As Per Layout Plan )

| Plot Nos | Plot area (sq.mt.) | Rounding area of road (SQMT) | No of Plot | Area of eachPlots in sq mt` | Permissible Built up area on normal FSI |
|---|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E | F |
| 1 | 750.55 | - | 1 | 750.55 | 1242.91 |
| 2 | 892.16 | 7.74 | 1 | 884.42 | 1464.58 |
| 3 | 191.55 | 6.05 | 1 | 185.50 | 255.99 |
| 4,5,6 | 150.00 | - | 3 | 150.00 | 207.00 |
| 7 | 190.97 | - | 1 | 190.97 | 263.53 |
| 8 | 166.87 | - | 1 | 166.87 | 230.28 |
| 9,10,11 | 135.00 | - | 3 | 135.00 | 186.30 |
| 12 | 254.25 | 6.05 | 1 | 248.20 | 342.51 |
| 13 | 178.12 | 6.05 | 1 | 172.07 | 237.45 |
| 14,15,16 | 131.40 | - | 3 | 131.40 | 181.33 |
| 17 | 209.87 | - | 1 | 209.87 | 289.62 |
| 18 Amenity space | 356.99 | - | 1 | 356.99 | - |
| | | Total Plots Area | | 4057.65 | |

शर्ती व अटी :-

१) ही परवानगी २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ यात आणखी सुधारणा अधिनियम, दि. २२ डिसेंबर २०१४ अंतर्गत व महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक एनएपी-२०१६/प्र.क्र. ७/टी-१, दिनांक २२ जानेवारी २०१६ नुसार महाराष्ट्र जमिन व महसुल अधिनियम १९६६ (दुसरी सुधारणा) नुसार नियम यांना अधिन ठेवून देण्यात आलेली आहे. व या संबधाने कार्यालयास प्राप्त झालेल्या ना-हरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

२) ज्या प्रयोजनासाठी अकृषक परवानगी दिलेली आहे, त्या खेरीज मुख्याधिकारी, नागभीड यांचे पुर्व परवानगी शिवाय इतर वापर अनुज्ञेय नाही.

३) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कलम ४७ अ मध्ये नमुद केलेल्या दराने रूपांतरण करण्याचा आणि त्याबद्दलच्या अकृषक आकारणीचा भरणा केल्यावर महसुल प्राधिकाऱ्याकडून सनद प्राप्त करून घेण्याची जबाबदारी अर्जदारास बंधनकारक राहील.

४) अनुज्ञाग्राही व्यक्तीने (ग्रँटीने) अशा जमिनीचा वापर व त्यावरील इमारतीच्या किंवा अन्य बांधकामाचा उपयोग, उक्त जमिनीचा ज्याप्रयोजनार्थ करण्यास परवानगी देण्यात आली असेल, केवळ त्याच प्रयोजनार्थ केला पाहिजे. आणि त्याने जमिन किंवा तिचे कोणतेही भाग किंवा अशी इमारत यांचा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकारी यांच्या कडून तशा अर्थ ची आगाऊ लेखी परवानगी मिळाल्याशिवाय वापर करता कामा नये. इमारतीच्या वापरावरून जमिनीचा वापर ठरविण्यात येईल.

५) अशी परवानगी देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडून अशा भुखंडाची किंवा त्याचे जे कोणतेही उपखंड करण्याबाबत मंजुरी मिळाली असेलल्या उपभुखंडाची आणखी पोट विभागणी करता कामा नये.

६) अनुज्ञाग्राह व्यक्तीने (अ) नगर पालिका यांचे समाधान होईल अशा रितीने अशा जमिनीत रस्ते, गटारे वगैरे बांधून आणि जमिन या आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आंत मंजुर आरखडया प्रमाणेच काटेकोरपणे विकसित केली पाहिजे आणि अशा रितीने जी जमिन विकसित केली जाईल पर्यंत त्या जमिनीची कोणत्याही रितीने विल्लेवाट लावता कामा नये.

७) अनुज्ञाग्राही व्यक्तीस असा भुखंड विकायचा असेल किंवा त्याची इतर प्रकारे विल्लेवाट लावायची असेल तर अशा अनुज्ञाग्राही व्यक्तीने तो भुखंडया आदेशात आणि सनदीमध्ये नमुद केलेल्या शर्तीचे पालन करूनच विकणे किंवा अशा शर्तीनुसारच त्याची अन्य प्रकारे विल्लेवाट लावणे आणि त्याने निष्पादीत केलेल्या विलेखात तसा खास उल्लेख करणे हे त्याचे कर्तव्य असेल. यासोबत जोडलेल्या स्थळ आराखडयात आणि किंवा इमारतीच्या नकाशात निर्दीष्ट केल्याप्रमाणे इतक्या जोतक्षेत्रावर बांधकाम करण्याविषयी ही परवानगी देण्यात आली आहे. सदर भुखंडातील नकाशात दर्शविल्याप्रमाणेच उर्वरीत क्षेत्र विना बांधकाम मोकळे सोडले पाहीजे.

८) या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तींना अशा जमिनीचा बिगर शेती प्रयोजनासाठी वापर करण्यास सुरूवात केली पाहीजे. मात्र वेळोवेळी असा कालावधी वाढविण्यात आला असेल. तर अशा वाढ दिलेल्या कालावधीत वापरास सुरूवात केली पाहिजे. अनुज्ञाग्राही व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे वापरास सुरूवात न केल्यास हि परवानगी रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

९) विषयांकीत जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी, बांधकाम नकाशे नियोजन प्राधिकरण नगरपरिषद, नागभीड यांचे कडून मंजुर करून घ्यावे.

१०) अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास भुखंड आखतांना ती नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत. तसेच रस्त्याचे दुतर्फा व बांधकाम परीसरातील मोकळया जागेत जास्तीत जास्त वृक्षारोपण करून त्याची देखभाल स्वखर्चाने करावी लागेल.

११) विषयांकीत जमिनीतून जाणाऱ्या विद्युत वाहीनीपासून चे सामासीक अंतर हे अहवाल इंडियन इलेक्ट्रीसीटी रूल्स व दुरूस्ती तसेच म. रा. विद्युत डीस्ट्रिब्युशन कंपनीच्या अद्यावत नियमानुसार असावे.

१२) विषयांकीत जागेतून उच्च दाबाची वाहीनी किंवा दुरध्वनी जात असेल तर ती रस्त्याचे कडेला स्थानांतरीत केल्या शिवाय त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये.

१३) प्रस्तावित ले-आऊट चे सांडपाणी वाहुन नेण्याची व्यवस्था, रस्ते, विद्युत व्यवस्था व पाणीपुरवठा आवेदकास स्वखर्चाने करावे लागेल. तसेच उपरोक्त परिसरातील सांडपाणी रस्त्यावर वाहून येणार नाही. याची दक्षता घ्यावी लागेल.

१४) मंजुर अभिन्यास मधील प्लॉट क्र. **४ व ५** हे गहाण ठेवण्यात येत आहे. अभिन्यास पूर्ण पणे विकसीत केल्याशिवाय नगर परिषद प्रशासन यांचे स्थायी निर्देश क्र. ३३ मधील अटि व शर्ती पूर्ण केले असल्याची खात्री पटल्याशिवाय तसे प्रमाणपत्र या कार्यालयाकडू न दिल्याशिवाय न. प. कडे गहाण ठेवलेल्या प्लॉटची विक्री करू नये याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. तसेच मंजुर अभिन्यासातील भुखंड रस्ते मोकळया जागेवरील अकृषक आकारणीची कार्यवाही महसुल विभागाकडून पूर्ण झाले नंतरच वन. प. कडे त्याचे हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाले नंतरच या कार्यालयाचे परवानगी शिवाय इतर कोणतेही भुखंडाची विक्री करता येणार नाही.

१५) **स.न. २२९/३** या अभिन्यासातील रस्त्या अंतर्गत चे क्षेत्र **१५०८.३७** चौ. मी. व खुली जागा क्षेत्र **६७६.९९ चौ.मी.** याची नोंद नगर परिषद नागभीडच्या नांवे करण्यात येत आहे.

१६) अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमिनीचे बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यास ज्या दिनांकास सुरूवात केली असेल, आणि किंवा ज्या दिनांकास त्याने अशा जमिनीच्या वापरात बदल केला असेल, तर तो दिनांक त्याचे एक महिन्याच्या आंत तलाठयास आणि नगर पालिकेस कळविला पाहिजे. जर तो तसे करण्यास चुकेल तर महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व बिर शेतकी आकारणी) नियम १९६९ मधीलनियम ६ अन्वये त्यांच्यावर कार्यवाही करण्यास असा अनुग्राही पात्र ठरेल.

१७) **स.न. २२९/३** एकूण आराजी **०.६६** हे. आर मूहणजेच **६६००.००** चौ.मी. असून, अभिन्यासातील भुखंडाखालील क्षेत्र **४०५७.६५ चौ. मी.** असल्यामुळे सदरहू अभिन्यासतील भुखंडाखालील (खुलीवर स्त्याची जागा वगळून) कृषक सारा आकारण्यात यावा.

१८) अशा जमिनीचा त्या प्रयोजनार्थ वापर करण्यास अनुज्ञाग्राहीस परवानगी देण्यात आली असेल. त्या प्रयोजनार्थ वापर करण्यास प्रारंभ करण्याच्या दिनांकापासून सदर अनुज्ञाग्राहीने त्या ठिकाणच्या संवर्गात दर चौ.मी. मागे शासकीय दराने बिगरशेतकी आकारणी दिली पाहीजे. अशा जमिनीच्या वापरात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आला तर त्याप्रसंगी निराळया दराने बिगर शेतकी आकारणी करण्यात येईल. आणि अशा वेळी हमीची मुदत अजून समाप्त व्हावयाची आहे. ही गोष्ट विचारात घेण्यात येणार नाही.

१९) सदर जमिनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्राहीने अशा जमिनीवर आवश्यक ती इमारत बांधली पाहीजे. अन्यथा सदरहू आदेश रद्द समजण्यात येईल. व अनुग्राहीयांना अकृषिक परवानगीसाठी नव्याने अर्ज सादर करावा लागेल.

२०) शासन निर्णयानुसार वेळोवेळी आकारण्यात येणाऱ्या दराने अकृषिक आकारणी सदरहू आदेशामध्ये करण्यात आलेली असली तरी महाराष्ट्र जमीन महसुलअ धिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार आणि त्याअनुषंगाने वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या प्रचलित नियमानुसार हा आदेश वितरीत झालेपासून अकृषिक आकारणीचे जे सुधारीत प्रमाण दर अंमलात येतील त्यादरानुसार आकारणीची रक्कम भरणे परवानगी धारकावर बंधनकारक राहील.

२१) पुर्वीच मंजुर केलेल्या नकाशावर हुकूम अगोदरच बांधलेल्या इमारतीत अनुज्ञाग्राहीने कोणतेही भर घालता कामा नये. किंवा ती मध्ये कोणतेही फेरबदल करता कामा नये. मात्र अशी भर घालण्याची किंवा फेरबदल करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेवून आणि अशा भरीचे किंवा फेरबदलाचे नकाशे करून घेवून तशी कार्यवाही करता येईल.

२२) अनुज्ञाग्राही व्यक्तीने आजूबाजूच्या परिसरात अस्वच्छता व घाण होणार नाही अशारितीने आपल्या स्वत:च्या खर्चाने आपली पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची निचरा करण्याची व्यवस्था केली पाहीजे. ही तरतुद बंधनकारक आहे.

२३) जमिनीच्या बिगर शेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचे कालावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तीने महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल बिगरशेतकी आकारणी) नियम १९६९ यातील अनुसुचि पाच मध्ये सनद दिली पाहीजे. आणि आदेशातील सर्व बाबीचा समावेश सनदेत करण्यात येईल व अशा शर्ती अर्जदारावर बंधनकारक असतील.

२४अ) या आदेशातील आणि सनदी मधील नमुद केलेल्या शर्ती पैकी शर्ती अनुज्ञाग्राही व्यक्तीने उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये असा अनुज्ञाग्राही ज्या कोणत्याही शास्तीस पात्र ठरेल. त्या शास्तीस बाधा न येऊ देता सक्षम प्राधिकरण ते निर्दिष्ट करेल असा दंड आणि आकारणी भरल्यानंतर उक्त जमिन किंवा भुखंड अर्जदाराच्या ताब्यात राहू देण्याचा अधिकार असेल.

ब) वरील खंड अ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरीही या परवानगीच्या तरतुदीच्या विरूद्ध जावून कोणतेही इमारत किंवा बांधकाम उभे करण्यात आले असेल. किंवा अशा तरतुदी विरूद्ध या इमारतीच्या किंवा बांधकामाचा वापर करण्यात आला असेल तर विहीत मुदतीच्या आंत अशा रितीने उभारलेली इमारत काढून टाकण्या विषयी किंवा ती रद्द करणे विषयी सक्षम प्राधिकाऱ्याने निर्देश देणे विधी संमत असेल. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याला अशी इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्याचे किंवा त्यात फेरबदल करण्याचे काम करवून घेण्याचे किंवा त्या प्रित्यर्थ आलेला खर्च अनुज्ञाग्राही व्यक्तीकडून जमिन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करून घेण्याचा अधिकार असेल.

२५) दिलेली ही परवानगी मुंबई कुळवहीवाट व शेतजमिन अधिनियम १९४८, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि नगरपालिका अधिनियम इत्यादी सारख्या त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचे कोणतेही उपबंध प्रकरणाच्या अन्य संबधित बाबीच्या बाबतीत लागू होतील. त्या उपबंधाच्या अधिन असेल

२६) आदेशातील कोणत्याही अटिचा भंग झाल्याचे निदर्शास आल्यास मुख्याधिकारी नगर परिषद नागभीड दंडणीय कार्यवाही करू शकतील व अशा प्रकारे केलेला दंड हा मालमत्ता कराची थकबाकीस मजुन वसूल करण्यात येईल.

२७) अनुग्राही यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम (जमिनीच्या वापरास बदल व अकृपिक आकारणी ) नियम १९६९ नुसार वर नमुद केलेल्या आदेशातील अटि / शर्ती मान्य असल्याबाबत बंधपत्र लिहुन दिले पाहीजे.

२८) निवास वापर विकास परवानगी अनुषंगाने अभिन्यास मंजुर झालेल्या दिनांकापासुन एका वर्षात जमिनिची अकृपिक वापर सुरु न केल्यास विकास परवानगी रद्द होईल.

२९) विषयांकीत जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी, बांधकाम नकाशे नियोजन प्राधिकरण नगर परिषद, नागभीड यांचे कडून यांचे कडून मंजुरी घ्यावी.

३०) अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास भुखंड आखतांना ती नष्ट नकरता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत. तसेच रस्त्याचे दुतर्फा व बांधकाम परीसरातील मोकळया जागेत जास्तीत जास्त वृक्षारोपण करून त्याची देखभाल स्वखर्चांनी करावी लागेल.

३१) विदयमान जुने/नविन सर्व प्रकारचे इमारत बांधकाम नगरपालीकेला लागु असलेल्या सर्व इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली नुसार सामासिक अंतरात येत असल्यास पाडून टाकावी लागेल.

३२) विषयांकीत जमिनीतून जाणाऱ्या विद्युत वाहीनी पासूनचे सामासीक अंतर हे अहवाल इंडियन इलेक्ट्रीसीटी रूल्स व दुरूस्ती तसेच म. रा. विद्युत डीस्ट्रिब्युशन कंपनीच्या अद्यावत नियमानुसार असावे.

३३) विषयांकित जमिनितून पाण्याचे स्त्रोत असल्यास संबंधित विभागाचे (पाटबंधारे / जलसिंचन विभाग )आवश्यकते नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल . विषयांकित जमिनीचा पोत असणे आवश्यक राहील.

३४) भविष्यकाळात भुखंडाचे विभाजन करता येणार नाही.

३५) प्रस्तावित लेऑउटचे सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था, रस्ते विदयुत व्यवस्था व पाणीपुरवठा आवेदकास स्वखर्चाने करावे लागेल तसेच उपरोक्त् परीसरातील सांडपाणी रस्त्यावर वाहुन येणार नाही यावी दक्षता घ्यावी लागेल.

३६) आखणी नकाशाची (ले-ऑउट) जमिन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यालगत रस्त्याच्या दर्जानुसार इमारत व नियंत्रण रेषेचे अंतर दर्शविलेल्याले – आउट नकाशा ची साक्षंकित व प्रमाणित प्रत मंजुरी करीता ग्राह्य समजावी.

३७) रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे क्रासिंग (सि.डिवर्क) इत्यादी पुर्व परवानगी शिवाय करण्यात येउ नये.

३८) अभिन्यासातील कोणत्याही भुखंडावर बांधकाम / विकास करताना नगर परिषद नागभीड स लागुअसलेल्या प्रचलित इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे परवनगी घेणे आवश्यक असेल.

३९) स.न. २२९/३ या अभिन्यासातील रस्त्या अंतर्गतचे क्षेत्र **१५०८.३७** चौ.मि. ओपन स्पेस क्षेत्र **६७६.९९** चौ.मि.एकुण क्षेत्र **२१८५.३६** चौ.मि. न.प. नागभीड हस्तांतरीत झाल्याचे घोषीत करण्यात येत आहे. सदर रस्त्याचे आणि ओपन स्पेसचे क्षेत्र याची नोंद नगरपरिषद नागभीड यांचे नावे करण्यात येत आहे.

४०) अभिन्यासातील कोणत्याही भुखंडावर बांधकाम प्रस्तावीत केले आणि प्रस्तुत भुखंड जर रेल्वेची सिमेपासुन ३०मिटरच्या अंतरावर असेल तर रेल्वे विभागाकडुन नाहरकत प्रमाणपत्र घेणे अर्जदारास बंधनकारक राहिल.

४१) नगर परिषदेच्या मालमत्ता कर विभागात भुखंडावरील प्लॉटची नोंदनी विकासकांच्या नावाने घेण्यात येवून एका वर्षाचा आगाऊ कर भरणा करणे विकासकावर बंधनकारक असेल.

४२) अकृषक झालेले भुखंडावरील प्लॉट विकासकाने विकल्यानंतर विक्री नुसार मालमत्ता रजिस्टरवर फेरफार घेण्यात येईल. अशा स्वरुपाचा फेरफार न झाल्यास मालमत्ता कर भरणा करण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

४३) सर्व संबंधित विभागांनी नमुद केलेल्या सर्व अटि व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

४४) अर्जदाराची कागदपत्रे चुकिची आढळल्यास किंवा सार्वजनिक शांतता व सुव्यस्थेचे दृष्टिने अहवाल प्राप्त् झाल्यास अकृषिक परवाना न देता रदद करण्यात येईल सदर जमिन शासकिय वाटपातील आढळुन आल्यास परवानगी रदद होईल व नियमानुसार कार्यवाही कागदपत्रे तसेच क्षेत्राचे सत्यते बाबत सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील, याबाबत कोणताही वाद / न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास ही परवानगी रदद करण्यात येईल.

-सही-
नियोजन प्राधिकरण अधिकारी
तथा मुख्याधिकारी
नगर परिषद, नागभीड

प्रतिलीपी :-

१. मा. उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी. यांना माहितीस तथा अकृषक आकारणी तथा इतर आवश्यक कार्यवाहीच्या अनुषंगाने सविनय सादर.
२. मा. सहाय्यक संचालक नगर रचना चंद्रपूर, यांना माहितीस सविनय सादर.
३. मा. तहसिलदार, नागभीड यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीचे अनुषंगाने सविनय सादर.
४. मा. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कार्यालय नागभीड यांचे माहितीस.
५.दुय्यम निबंधक, नागभीड, यांना सदरआदेशातील अटि व शर्तीस अधिन राहून अट क्र. १५ नुसार आवश्यक कार्यवाहीस रवाना.
६. कर निरीक्षक यांना सदरले-आऊट मधील प्लॉटची मालमत्ता करआकारणी करून नोंद घेण्यास अग्रेषीत.
७. श्री.**विजय तुळशिराम येरणे व स्वप्नील रमेश येरणे रा.नागभीड ता.नागभीड** जि- चंद्रपुर यांना माहितीस रवाना.
८. तलाठी अधिकारी त.सा.क्र. --------------

नियोजन प्राधिकरण अधिकारी
तथा मुख्याधिकारी
नगर परिषद, नागभीड